महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३८ वा दिनांक : २७/१०/२०२४ वार : रविवार

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीची दुसरी यादी जाहीर



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने शनिवारी विधानसभा निवडणुकीसाठी आपली दुसरी उमेदवार यादी जाहीर केली. त्यात पक्षाने एरंडोल विधानसभा मतदारसंघातून सतीश अण्णा पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातून आलेल्या सतीश चव्हाण यांना गंगापूर येथून विधानसभेच्या मैदानातून उतरवले आहे. याशिवाय पक्षाने माळशिरस येथून उत्तम जानकर यांना तिकीट दिले आहे.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी शनिवारी दुपारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत आपल्या पक्षाची दुसरी यादी जाहीर केली. यावेळी त्यांनी भाजप नेत्याने काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येविषयी केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा निषेध केला. हे सरकार महिलांना सन्मान करण्याची भाषा करते. पण त्यांच्याच पक्षाच्या नेत्यांनी संगमनेरमध्ये महिलांचा अपमान केला. त्यांच्या या विधानावरून भाजपचे चारित्र्य स्पष्ट होते, असे ते म्हणाले.

खाली वाचा शरद पवार गटाची दुसरी यादी सतीश अण्णा पाटील – एरंडोल, सतीश चव्हाण – गंगापूर, पांडूरंग वरोरा – शहापूर, राहुल मोटे – परांडा, संदीप क्षीरसागर – बीड, मयुरा काळे – आर्वी, दीपिका चव्हाण – बागलाण, माणिकराव शिंदे – येवला, उदय सांगळे – सिन्नर, सुनीत चारोसकर – दिंडोरी, सचिन दोडके – खडकवासला, गणेश गीते - नाशिक पूर्व, ओमी कलाणी – उल्हासनगर, सत्यशिल शेलकर – जुन्नर, सुलक्षणा शिलवंत – पिंपरी, अश्विनी कदम – पर्वती, अमित भांगरे – अकोले, अभिषेक कळंबकर - अहिल्यानगर शहर, उत्तम जानकर – माळशिरस, दीपक चव्हाण – फलटण, नंदिनी बाभूळकर – चंदगड, मदन कारंडे - इचलकरंजी

## भाजपचा दंगे घडवण्याचा प्रयत्न : संजय राऊत



**मुंबई** : भारतीय जनता पक्षाला राज्यामध्ये दंगली घडायच्या आहेत. अतिशय विकृत लोक या पक्षांमध्ये बसलेले आहेत. राज्यातील घरंदाज स्त्रियांविषयी अपशब्द वापरून तणाव निर्माण करणे, असा नवीन धंदाच या पक्षातील नेत्यांनी सुरु केला आहे. भाजप हा असंस्कारी पक्ष असल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. संगमनेर मध्ये घडलेल्या घटनेवरुन राऊत यांनी जोरदार हल्ला चढवला.

योगी आदित्यनाथ हे आमचे सुरुवातीपासूनचे मित्र आहेत. आम्ही त्यांचा आदर करतो. ते आमचे बाबाजी आहेत. मात्र निवडणुकीचा विचार करता महाराष्ट्र येऊन ते काय करणार? असा प्रश्न संजय राऊत यांनी उपस्थित केला. बाबाजी हे उत्तर प्रदेश मध्येच लोकसभा निवडणुकीत पक्षाला वाजवू शकले नाही. आयोध्या, चित्रकूट ते वाचू शकले नाही. त्यामुळे ते महाराष्ट्रात काय करणार? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला.

योगी आदित्यनाथ हे केवळ भडकाऊ भाषणे करतील. दंगे भडकवण्याचा प्रयत्न करतील. मात्र, ते आता एका राज्याचे मुख्यमंत्री आहेत, हे त्यांनी लक्षात ठेवायला हवे. त्यामुळे महाराष्ट्रात 'ना कोई बटेगा, ना कोई कटेगा' असे म्हणत त्यांनी योगी आदित्यनाथ यांच्यावर टीका केली. त्यांची बटेंगे-कटेंगीवाली भाषा आमच्या राज्यात चालणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

# भाजपची दुसरी यादी जाहीर २२ नावे घोषित

**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील भाजप पक्षाकडून दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत २२ उमेदवारांचे नावे जाहीर करण्यात आली आहे.

या यादीत काही विद्यमान आमदारांनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे. तर काही नवीन चेहऱ्यांना देखील निवडणुकीच्या रिंगणार उतरवण्यात आले आहे.

पहिल्या यादीमध्ये भाजपने ९९ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली होती. त्यानंतर आता भाजपकडून २२ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पहिली आणि दुसरी यादी मिळून एकूण १२१ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. गोपीचंद पडळकरांना जतमधून तिकीट देण्यात आले आहे, तर देवयानी फरांदे यांना नाशिक मध्य या विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

भाजपच्या दुसऱ्या यादीतील उमेदवारांची नावे १. पुणे छावणी - सुनील कांबळे २. कसबा - हेमंत रासने ३. लातूर ग्रामीण - रमेश कराड ' ४. उल्हासनगर - कुमार आयलानी ५. शिराळा - सत्यजित देशमुख ६. धुळे ग्रामीण - राम भदाणे ७. मलकापूर - चैनसुख संचेती ८. अकोला पश्चिम - विजय अग्रवाल ९. ब्रह्मपुरी - कृष्णलाल सहारे १०. वाशिम - श्याम खोडे ११. खडकवासला - भीमराव तापकीर १२. जत - गोपीचंद पडळकर १३. अकोट - प्रकाश भारसाखले १४. मेलघाट - केवलराम काळे १५. नाशिक मध्य - देवयानी फरांदे १६. पंढरपूर - समाधान आवताडे १७. वरोरा - करण देवतळे १८. विक्रमगड - हरिश्चंद्र भोये १९. सोलापूर शहर मध्य - देवेंद्र कोठे २०. राजुरा - देवराव भोंगळे २१. गडचिरोली - मिलिंद नरोटे २२. पेन - रवींद्र पाटील

## प्रकाश आंबेडकरांच्या विरोधात पुतण्या राजरत्न आंबेडकर



**जालना** : विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्याच्या राजकारणात मोठ्या उलथापालथी सुरू आहेत. राज्यातील अनेक मतदारसंघात कौटुंबिक लढती होत आहेत. त्यातच आता बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजरत्न आंबेडकर यांनीही विधानसभेच्या निवडणुकीत उडी मारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी यासंबंधी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्याशी आघाडी करण्याचे संकेत दिलेत. असे झाले तर ते आपले चुलते तथा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांना आव्हान देतील.

राजरत्न आंबेडकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. त्यात राजरत्न आंबेडकर यांनी राज्यातील २९ राखीव जागा लढण्यावर चर्चा झाली. राजरत्न स्वतःही निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. पण ते नेमक्या कोणत्या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार हे पुढील २-३ दिवसांत ठरणार आहे. आपण मनोज जरांगे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरणार असल्याचेही राजरत्न आंबेडकर यांनी यावेळी सांगितले.

## भाजपच्या ४० स्टार प्रचाकांची यादी जाहीर








**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबरच नवनीत राणा यांच्या नावाचा देखील समावेश करण्यात आला आहे. या यादीमध्ये दोन महिलांचा देखील समावेश करण्यात आला आहे. यात नवनीत राणा यांच्याबरोबरच स्मृती इराणी आणि पंकजा मुंडे यांना देखील स्थान देण्यात आले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्टार प्रकारांच्या यादीमध्ये पक्षाचे प्रमुख नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग, अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासोबतच भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसेच राज्यातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे, नारायण राणे, पियुष गोयल, अशोक चव्हाण, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, पंकजा मुंडे, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रविंद्र चव्हाण यांचा देखील समावेश केला आहे. याचबरोबर नव्याने केंद्रात मंत्री झालेले मुरलीधर मोहोळ यांना देखील या यादीमध्ये स्थान देण्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने नवनीत राणा यांना अमरावती मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. मात्र, त्यांचा पराभव झाला. नवनीत राणा या हैदराबाद येथे देखील भाजपचा प्रचार करण्यासाठी पोहोचल्या होत्या. आता महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत देखील नवनीत राणा या भारतीय जनता पक्षाच्या स्टार प्रचारक असतील. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान नवनीत राणा यांनी केलेल्या मुस्लिम समाजाबद्दलच्या वक्तव्यामुळे चांगलाच वाद निर्माण झाला होता. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीत देखील नवनीत राणा यांच्या वक्तव्यांकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

भाजपच्या स्टार प्रचारकांची यादी नरेंद्र मोदी, जगत प्रकाश नड्डा, राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, योगी आदित्यनाथ, डॉ. प्रमोद सावंत, भूपेंद्रभाई पटेल, विष्णू देव साई, डॉ. मोहन यादव, भजनलाल शर्मा, नायब सिंह सैनी, हिमंता बिस्वा सरमा, शिवराज सिंह चौहान, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, शिवप्रकाश, भूपेंद्र यादव, अश्विनी वैष्णव, नारायण राणे, पीयूष गोयल, ज्योतिरादित्य एम. सिंधिया, रावसाहेब दानवे पाटील, अशोक चव्हाण, उदयनराजे भोंसले, विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, पंकजा मुंडे, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, स्मृती इराणी, प्रवीण दरेकर, अमर साबळे, मुरलीधर मोहोळ, अशोक नेते, डॉ. संजय कुटे, नवनीत राणा

## रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत फटाके वाजवण्यास बंदी

**नाशिक** - प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या सूचनेनुसार वायु प्रदूषण करणारे फटाके विक्री व वाजवणे तसेच रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत फटाके वाजविण्यास बंदी घालण्यात आली असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर महापालिका व पोलिसांची नजर असणार आहे. फटाके वाजवताना वायु प्रदूषण वाढणार नाही याची काळजी घेण्याचेही महापालिकेच्या पर्यावरण विभागाने आवाहन केले आहे. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत झालेल्या सर्वेक्षणात नाशिकचा क्रमांक १३१ इतका आला. गेल्या वर्षभरापासून महापालिका शहरातील वायुप्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. आता दिवाळीतही मोठ्या प्रमाणामध्ये वायू आणि ध्वनी प्रदूषण होण्याची भीती असून या पार्श्वभूमीवर महापालिकेने हा निर्णय जाहीर केला आहे.

## वाशिममध्ये काही ठिकाणी उमेदवार लागले कामाला, तर काही ठिकाणी प्रतिक्षा

**वाशिम :** जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात निवडणूकीचे वातावरण तापायला सुरुवात झाली असून वाशिम जिल्ह्यात एकूण ३ मतदार संघ आहे. तर २०१९ मध्ये कारंजा व वाशिम मतदारसंघ भाजपकडे होते, रिसोड हा मतदारसंघ काँग्रेस कडे होता. पण या वेळी जिल्ह्यात युती व आघाडीचे उमेदवार समोरासमोर लढणार असल्याचे चित्र आहे.

कारंजा, मानोरा. मतदार संघात स्व. राजेंद्र पाटणी यांनी भाजपचा गड राखत २०१९ मध्ये तिसऱ्या वेळी विजय मिळविला होता. तसेच त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीचे स्व. प्रकाश डहाके यांच्या निधनामुळे ही सिट त्यांच्या पत्नी सईताई प्रकाश डहाके यांना मिळणार असल्याचे बोलले जात आहे. तसेच राजेंद्र पाटणी यांच्या निधनाने रिक्त झालेली जागा त्यांचे पुत्र ज्ञायक राजेंद्र पाटणी हे लढविण्यार असल्याने चुरस निर्माण होणार आहे. तर कारंजा मतदारसंघासाठी राजु पाटील राजे हे सुद्धा उमेदवारीसाठी उत्सुक आहेत.

वाशिम मंगरूळपिर विधानसभा मतदारसंघात मागिल तिन वेळा निवडुन येणारे आमदार लखन मलिक यांचे नाव भाजपच्या पहिल्या यादीत नसल्याने भाजपचे इतर स्थानिक नेते राहुल तुपसांडे, डॉ. दिपक ढोके हे आपआपली फिल्डींग लावण्याचे बोलले जात आहे. तसेच आमदार लखन मलिक यांचे २०१९ चे प्रतिस्पर्धी वंचितचे डॉ. सिद्धार्थ देवळे यांनी या वेळी शिवबंधन बांधुन मशाल हाती घेतली आहे.

तर रिसोड मालेगाव मतदारसंघात या वेळी काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष तथा आमदार अमित झनक यांना उमेदवारी दिली आहे. तर त्यांचे प्रतिस्पर्धी माजी मंत्री तथा खासदार अनंतराव देशमुख यांनी काँग्रेस ला सोडचिठ्ठी देत २०१९ मध्ये अपक्ष निवडणूक लढविली होती. यात झनक यांचा खुप कमी मताने विजय झाला होता. तसेच अनंतराव देशमुख यांनी यावेळी भाजप मध्ये प्रवेश केला असून काटे की टक्कर होणार, असे बोलले जात आहे. आता निवडणुक निकाला नंतरच सर्व चित्र स्पष्ट होईल.

कारंजा मानोरा मतदार संघ हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. तर राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या सईताई डहाके यांच्या नावाची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. या वेळी डहाके यांना उमेदवारी मिळाली तर पाटणी यांचे पुत्र काय करणार याकडे मतदारांचे लक्ष लागून आहे. वाशिम मंगरूळपिर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व मागिल तिन वेळा लखन मलिक यांनी केले, तर या वेळी पहिल्या यादीत नाव न आल्याने उमेदवारीची माळ कुणाच्या गळ्यात पडेल या कडे मतदारांचे लक्ष लागुन आहे.

रिसोड, मालेगाव मतदार संघाचे प्रतिनिधित्व मागिल तिन पिढ्या पासून झनक कुटुंब करीत आले आहे. तर त्यांचे पारंपारिक प्रतिस्पर्धी अनंतराव देशमुख यांनी काँग्रेस चा हात सोडत भाजप मध्ये प्रवेश घेतला पण भाजप कडुन कुठलिही उमेदवारी जाहिर झाली नसल्याने कुणाला लॉटरी लागेल असे बोलल्या जात आहे.

## काँग्रेसला वर्षा गायकवाड आणि त्यांच्या पतीकडून वाचवा - अमित शेट्टींचा आरोप



**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकीय पक्षांची यादी जाहीर करण्यात येत आहे. महाविकास आघाडीमधील घटक पक्षांनी देखील उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यास सुरुवात केली आहे. मात्र उमेदवरीवरून काँग्रेस पक्षात वाद असल्याचे समोर आले आहे. मुंबईमधील खासदार वर्षा गायकवाड यांच्या बहिणीला काँग्रेस पक्षाकडून तिकीट देण्यात आल्याने मुंबई काँग्रेसचे सरचिटणीस आणि अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सदस्य अमित शेट्टी यांच्याकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाला वर्षा गायकवाड आणि त्यांच्या पतीपीसून वाचवा, अशी थेट मागणीच अमित शेट्टी यांनी केली आहे. अमित शेट्टी म्हणाले, वर्षा गायकवाड आणि त्यांचे पती दोघेही काँग्रेस पक्ष विकण्यासाठी चालले आहेत. त्यांच्यापासून काँग्रेस पक्षाला वाचवण्याची गरज आहे. पक्षातील वरिष्ठांना डावलून वर्षा गायकवाड यांच्याशी खास असलेल्या लोकांना उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप अमित शेट्टी यांनी केला आहे.

पुढे बोलताना अमित शेट्टी म्हणाले, सायन कोळीवाडा विधानसभा मतदारसंघात साडेचार वर्षे ज्यांनी पक्षासाठी काहीच काम केले नाही, वर्षा गायकवाड यांच्या मागे जे फिरले त्यांनाच उमेदवारी देण्यात आली. धारावीत जे पक्षाचे सदस्य सुद्धा नाहीत आशा ज्योति गायकवाड यांना फक्त वर्षा गायकवाड यांची बहीण म्हणून उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप अमित शेट्टी यांनी यावेळी केला आहे.

महाविकास आघाडीमध्ये काही जागांवरून अद्यापही तोडगा निघाला नाही. काही जागांवरून मतभेद असून काँग्रेस आणि शिवसेनेकडून दावा केला जात आहे. तसेच काही जागांवर सख्खे भाऊ निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत, तर काही ठिकाणी बाप विरुद्ध लेक अशी लढत होणार आहे. त्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक रोमांचक होणार असल्याने सर्वांचेच लक्ष या निवडणुकीवर लागले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ ऑक्टोबर २०२४


## राष्ट्रीय समाज पक्षाच्या उमेदवारांची यादी जाहीर

### महादेव जानकरांनी महायुतीमधून बाहेर पडत दिला स्वबळचा नारा



**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आता उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यास सुरुवात केली आहे. आता राष्ट्रीय समाज पक्षाने देखील उमेदवारांच्या नावांची यादी जाहीर केली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांच्या नेतृत्वात प्रदेशाध्यक्ष काशीनाथ शेवते यांनी ही यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये एकूण ६५ उमेदवारांची नावे आहेत. कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघातून विकास मासाळ, ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघातून संजय कन्नवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी महायुतीतून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. महादेव जानकर यांचा पक्ष आता राज्यात स्वबळावर निवडणूक लढवणार आहे. त्यामुळे आणखी उमेदवारांची नावे घोषित करणार आहेत. महादेव जानकरांनी लोकसभा निवडणूक ही महायुतीच्या माध्यमातून लढवली होती. मात्र परभणीतून त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभेला आपल्या पक्षाला सन्मानजनक जागा मिळाव्यात यासाठी जानकर प्रयत्नशील होते. पण त्यांना अपेक्षित जागा मिळणार नाही असं लक्षात येताच त्यांनी महायुतीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

पहिली यादी १) ९७ गंगाखेड - आ.डॉ. रत्नाकर माणिकराव गुट्टे २) २३६ अहमदपूर - मा.आ. बब्रुवान खंदाडे ३) ८५ भोकर - साहेबराव बाबा गोरटकर ४) २४२ कळम धाराशिव - श्रीहरी वसंत माळी ५) २४३ परांडा - डॉ. राहुल भीमराव घुले ६) ९६ परभणी - सावित्री सतीश महामुनी चकोर ७) ९१ मुखेड - विजयकुमार भगवानराव पेठकर ८) ८४ हदगाव हिमायतनगर ॲड. संतोष उत्तमराव टीकोरे ९) ८९ नायगाव - हनुमंतराव मारोतराव वनाळेकर १०) २०१ बारामती - संदीप मारुती चोपडे ११) २५० अक्कलकोट - सुनील शिवाजी बंडगर १२) २२३ राहुरी - नानासाहेब पंढरीनाथ जुंधारे१३) १४० अंबरनाथ - रुपेश धोरात १४) २३८ निलंगा - नागनाथ बोडके १५) २०० इंदापूर - तानाजी उत्तम शिंगाडे१६) ९० देगलूर - श्याम बाबुराव निलंगेकर १७) ११० पैठण - प्रकाश उत्तमराव दिलवाले १८) ११२ वैजापूर गंगापूर - बाबासाहेब कचरू राशिनकर १९) २५९ कराड उत्तर - सोमनाथ रमेश चव्हाण २०१ २०२ पुरंदर - संजय शहाजी निगडे २१) २०३ भोर- रामचंद्र भगवान जानकर २२) २८६ खानापूर आटपाडी - उमाजी मोहन चव्हाण २३) २७४ कोल्हापूर दक्षिण- विशाल केरू सरगर २४) २७७ पन्हाळा शाहूवाडी - अभिषेक सुरेश पाटील २५) २७९ इचलकरंजी प्रा. सचिन किरण बेलेकर २६) २६२ सातारा - शिवाजी भगवान माने२७) १९६ आंबेगाव- योगेश पांडुरंग धरम२८) २१० कोथरूड - सोनाली उमेश ससाणे२९) २१५ कसबा पेठ शैलेश रमेश काची ३०) २०८ वडगाव शेरी - सतीरा इंद्रजीत पाण्डेय ३१) १५४ मागाठाणे - जिवाजी लेंगरे ३२) १५८ जोगेश्वरी पूर्व - विजय पतिराम यादव ३३) १६० कांदिवली - ओमप्रकाश सोनार ३४) १५९ दिडोशी - राकेश लालमनी यादव ३५) १३२ नालासोपारा - नरसिंह रमेश आदावळे ३६) १३३ वसई - हरिशंकर शेषनारायण जयस्वाल ३७) २५३ सांगोला - सोमा उर्फ आबा गुलाब मोटे ३८) १६४ वर्सोवा - मेहक चौधरी ३९) २४६ बार्शी - किशोर परमेश्वर गाडेकर ४०) २४४ करमाळा - विकास शिवाजी आलदर ४१) १८८ पनवेल - सुदाम शेठ जरग ४२) २०७ भोसरी - परमेश्वर बुरले४३) २१६ अकोले - पांडुरंग नानासाहेब पथवे४४) ५ साक्री - अनिता धनराज बागुत४५) ७३ ब्रह्मपुरी - संजय शंकर कन्त्रवार४६) १८९ कर्जत - बळीराम एडकर ४७) ४५ देवळी - अश्विनी गोविंद शिरपूरकर४८) २१ मलकापूर - प्रवीण तक्ष्मण पाटील४९) ३३ रिसोड - दीपक श्रीराम तिरके५०) ३० अकोता पश्चिम - इमरान मिर्झा५१) २९ बाळापुर - विश्वनाथ जावरकर५२) ८ सिंदखेडराजा - दत्तू रामभाऊ चव्हाण५३) ७८ यवतमाळ - धरम दितीपसिंग ठाकूर५४) ७९ दिग्रस - डॉ. श्याम फुर्तसिंग चव्हाण५५७८२ उमरखेड - प्रशेण रुपेश पाटील५६) ३७ बडनेरा - संजय महाजन५७) ३५ कारंजा मानोरा - संतोष हरिभाऊ दुर्गे५८) ५८ कामठी - नफीस अब्दुल अलीम शेख ५९) १२१ निफाड - शंकर एकनाथ साबळे ६१) २१८ शिर्डी - नानासाहेब सोन्याबापू काटकर ६२) २१९ कोपरगांव - शंकर सुखदेव लासुरे ६३) २२१ नेवासा - शशिकांत भागवत मतकर ६४) २२७ कर्जत जामखेड - विकास मिठूतात मासाळ ६५) २२४पारनेर- सखाराम मातोजी सरक

## काँग्रेसची २३ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर



**मुंबई** : काँग्रेसने शनिवारी विधानसभा निवडणुकीसाठी आपली २३ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यात छत्रपती संभाजीनगर पूर्व विधानसभा मतदारसंघातून मधुकर देशमुख, सावनेरमधून अनुजा सुनील केदार, नागपूर दक्षिणमधून गिरीश पांडव, जालन्यातून विद्यमान आमदार कैलास गोरंट्याल व निलंगा येथून अभयकुमार साळुंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

राज्यात येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार आहे. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा केली जात आहे. काँग्रेसने आपल्या यापूर्वीच्या पहिल्या यादीत ४८ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर शनिवारी जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत २३ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली.

काँग्रेस सरचिटणीस के सी वेणुगोपाल यांच्या स्वाक्षरीने जाहीर झालेल्या दुसऱ्या यादीत काँग्रेसने भुसावळ (राखीव) मतदारसंघातून राजेश तुकाराम मानवतकर यांना संधी दिली आहे. तर जळगाव (जामोद) येथून स्वाती संदीप वाकेकर यांना मैदानात उतरवले आहे.

यादी पुढीलप्रमाणे १) डॉ. राजेश तुकाराम मानवतकर - भुसावळ (राखीव), २) डॉ. स्वाती संदीप वाकेकर - जळगाव (जामोद), ३) महेश गांगणे — अकोट, ४) शेखर प्रमोदबाबू शेंडे — वर्धा, ५) अनुजा सुनील केदार — सावनेर, ६) गिरीश कृष्णराव पांडव - नागपूर दक्षिण, ७) सुरेश यादवराव भोयर — कामठी, ८) पूजा गणेश थावकर - भंडारा (राखीव), ९) दलीप वामन बनसोड - अर्जुनी - मोरगाव (राखीव), १०) राजकुमार लोटुजी पुरम - आमगाव (राखीव), ११) प्रो. वसंत चिंडूजी पुरके — राळेगाव, १२) अनिल उर्फ बाळासाहेब शंकरराव मंगुळकर — यवतमाळ, १३) जितेंद्र शिवाजीराव मोघे - आर्णी (राखीव), १४) साहेबराव दत्तराव कांबळे - उमरखेड (राखीव), १५) कैलास किसनराव गोरंट्याल — जालना, १६) मधुकर कृष्णराव देशमुख - छत्रपती संभाजीनगर पूर्व, १७) विजय गोविंद पाटील — वसई, १८) काळू बधेलिया - कांदीवली पूर्व, १९) यशवंत जयप्रकाश सिंह — चारकोप, २०) गणेश कुमार यादव - सायन कोळीवाडा, २१) हेमंग ओगळे - श्रीरामपूर (राखीव), २२) अभयकुमार सतीशराव साळुंखे — निलंगा, २३) गणपतराव आप्पासाहेब पाटील - शिरोळ

## जयश्री थोरात यांच्यावरील वक्तव्यामुळे वसंतराव देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल

**अहमदनगर** : कॉंग्रेस नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांच्यावर भाजपाचे नेते सुजय विखे -पाटील यांचे कार्यकर्ते वसंतराव देशमुख यांनी अतिशय खालच्या पातळीवर टीका केली आहे.

या वक्तव्यावरुन राजकारण तापले असतानाच आता या प्रकरणाची राज्य महिला आयोगाने देखील दखल घेतली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी या संदर्भात वसंतराव देशमुख यांच्या गुन्हा दाखल करण्यात आल्याचे म्हटले आहे. राज्य महिला आयोगाने याची दखल घेतलेली आहे.

राज्य महिला आयोगाने स्थानिक अहिल्यानगर पोलिसांना पत्राद्वारे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित व्यक्तीवर कारवाई करुन केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आलेले असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी म्हटले आहे.

हा महाराष्ट्र छत्रपती शिवरायांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे. हा महाराष्ट्र साधूसंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. या महाराष्ट्रात एखाद्या महिलेवर अशी अश्लाघ्य भाषेतील टीका खपवून घेतली जाणार नाही. प्रत्येक स्त्रीचा सन्मान हा राखला गेलाच पाहीजे असेही रुपाली चाकणकर यांनी म्हटले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002





# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २७ ऑक्टोबर २०२४


## संभाजीराजे छत्रपती अन् मनोज जरांगे यांची भेट



**जालना :** संभाजीराजे छत्रपती यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. आपले ध्येय एक आहे, वेगवेगळे लढू नये, अपक्ष आमदार सोयीचे राजकारण करतात, ते उभे केल्यास काय धोका आहे लक्षात आणूण दिल्याचे संभाजीराजे छत्रपती यांनी म्हटले आहे.

संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, समाजात वेगळा मेसेज जाऊ नये म्हणून आपण एकत्र आले पाहिजे, २९ च्या आधी हे फॉर्म दिले जावे लागतात त्यापूर्वी आपल्याला एकसंघ रहावे लागेल असे त्यांनी मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

उदय सामंत म्हणाले, मी माझ्या काही सहकाऱ्यांचे एबी फॉर्म घेऊन आलो होतो. मनोज जरांगे दिवसभर कामात व्यस्त असतात. त्यामुळे मी त्यांना फोन करून वेळ आहे का? अशी विचारणा केली. काल मला समजले आज ते कामातून थोडे मोकळे झालेत. त्यामुळे एक मित्र म्हणून त्यांची भेट घ्यावी, त्यांच्याशी संवाद साधावा या उद्देशाने मी येथे आलो.

आता मी मनोज जरांगे यांची रात्री भेट घेतली असती तर बातमी झाली असती. उन्हात भेटलो असतो तर ब्रेकिंग झाली असती. त्यामुळे कसे भेटायचे हा प्रश्नही माझ्यापुढे होता. पण आमची ही भेट राजकीय नव्हती. त्यात कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. मी आलो, त्यांना भेटलो, चर्चा झाली, चहा घेतला व निघालो.

मनोज जरांगे पाटील यांनीही यावेळी उदय सामंत यांच्याशी राजकीय व सामाजिक विषयांवर चर्चा झाल्याचे सांगितले. उदय सामंत यांच्याशी सामाजिक व राजकीय विषयांवर चर्चा झाली. देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण दिले नाही. त्यामुळे त्याच्यावर ३० तारखेला निर्णय येईल. आम्ही आमच्या निर्णयावर ठाम आहोत. आम्ही जे स्वप्न पाहिले ते पूर्ण झाले नाही. आम्हाला आरक्षणाची आस लागली होती. ती फडणवीस यांनी पूर्ण होऊ दिली नाही. आम्ही आतुरतेने वाट पाहत होतो, पण फडणवीसांनी आरक्षण मिळू दिले नाही, असे ते म्हणाले.

## शेवग्याच्या शेंगा खाण्याचे फायदे



व्हिटॅमिन बी १२, व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सीडेंट्स भरपूर प्रमाणात असतात. ज्यामुळे आरोग्यासंबंधी अनेक समस्यांपासून सुटका मिळवली जाऊ शकते.पचन चांगलं होतंशेवग्याच्या शेंगांमध्ये व्हिटॅमिन बी आणि व्हिटॅमिन बी१२ भरपूर प्रमाणात असतात. जे पचनक्रियेसाठी फायदेशीर आहे.

शेवग्याच्या शेंगा पचण्यासाठी हलक्या आहेत आणि यात फायबरचं प्रमाण जास्त असल्याने पचन क्रियाही सहज होते.ब्लड शुगर होते कमीडायबिटीस रूग्णांसाठी शेवग्याच्या शेंगा वरदान मानल्या जातात. याने ब्लड शुगर लेव्हल कमी करण्यास मदत मिळते. डायबिटीसचे रूग्ण शेवग्याच्या शेंगाचे पराठ, शेवग्याच्या शेंगाची भाजी किंवा खिचडीमध्ये शेंगा टाकून खाऊ शकतात.

इम्यूनिटी वाढतेशेवग्याच्या शेंगा खाल्ल्याने इम्यूनिटीही वाढते. व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असल्याने या शेंगा सर्दी-खोकलासारखे व्हायरल इन्फेक्शन कमी करण्यातही फायदेशीर ठरतात. सोबतच यातील अँटीबॅक्टेरिअल गुण बदलत्या वातावरणात होणारे आजारही दूर ठेवतात.

हाडे होतात मजबूतशेवग्याच्या शेंगा खाल्ल्याने तसे तर फायदे खूप होतात. पण ही भाजी जास्त हाडं मजबूत करण्यासाठी फायदेशीर मानली जाते. शेवग्याच्या शेंगा कॅल्शिअमचा स्त्रोत आहेत. म्हणजे यात भरपूर प्रमाणात कॅल्शिअम आहे. जे हाडांना मजबूत करतं.











## तिने राजसत्तेची दोरी कधी हातात घेऊच नये हा विचार मनुवादी - सुषमा अंधारे



**छत्रपती संभाजीनगर :** भाजपने संगमनेर मतदारसंघात आयोजित केलेल्या सभेत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येविषयी आक्षेपार्ह टीका करण्यात आली. यावरुन राज्यातील राजकारण तापले आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस, ठाकरे गट, शरद पवार गटाच्या नेत्यांनी वक्तव्यांचा निषेध केला आहे.

भरसभेत आपल्या मुलीच्या वयाच्या नेत्यावर अशा पद्धतीने गलिच्छ भाषेत टीका करण्यात आली,ही महाराष्ट्राची संस्कृती नाही, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी निषेध व्यक्त केला आहे. तर अमोल मिटकरी यांनी देशमुख नावाचे वृद्ध गहस्थ बरळले म्हणत या प्रकरणावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.

दरम्यान जयश्री थोरात यांनी काल रात्रभर पोलिस ठाण्याबाहेर ठिय्या मांडल्यानंतर आज या प्रकरणी वसंत देशमुख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर वसंत देशमुख हे बोलले त्यांना बोलायला सांगणारे कोण असा सवाल सुजय विखेंनी केला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, जयश्री थोरात, स्नेहल जगताप, सुप्रिया सुळे, सुषमा अंधारे ही नावे निमित्त मात्र आहेत. सत्ताधाऱ्यांकडून बाईपणावर हल्ले करणे यातून पुरुषी अहंकाराने पछाडलेली सरंजामी मानसिकता दिसते. बाईच्या हातात फक्त पाळण्याची दोरी असावी राजसत्तेची दोरी तिने कधी हातात घेऊच नये हा विचार मनुवादी आहे, असा हल्लाबोल ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी जयश्री थोरातांवरील टीकेनंतर केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथे भाजपाचे नेते वसंत देशमुख यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्रीताई थोरात यांच्या बाबतीत अतिशय गलिच्छ विधान केले. भरसभेत आपल्या मुलीच्या वयाच्या नेत्यावर अशा पद्धतीने गलिच्छ भाषेत टीका करण्यात आली,ही महाराष्ट्राची संस्कृती नाही.

विशेष म्हणजे माजी खासदार सुजय विखे देखील या सभेला उपस्थित होते. त्यांनी देखील या विधानाचे अप्रत्यक्षरित्या समर्थन केले. शिवरायांच्या ज्या राज्यात महिलांकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांना कठोर शिक्षा देण्यात येत होती. त्या राज्यात महिलांच्या बाबतीत अतिशय गलिच्छ भाषा वापरण्यात येत आहे. हे भाजपाचे संस्कार आहेत. या विधानाचा तीव्र निषेध. ईश्वर त्यांना सद्बुद्धी देवो ही प्रार्थना.

आमदार अमोल मिटकरी म्हणाले की, काल संगमनेर मध्ये काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येविषयी ज्या पद्धतीने देशमुख नावाचे वृद्ध गृहस्थ बरळले ते संताप जनक आहे. भाऊ म्हणुन आम्ही डॉ. जयश्री थोरात यांच्या पाठीशी खंबीर आहोत. राजकारण इतक्याही खालच्या पातळीवर जाऊ नये.